रेग्यु. दिवाणी मु.नं.४७९/१९
नंदा अडसुळ वि. निलेश गायकवाड
CNR NO.MHST140020122019

नि.२६, २८ आणि ३० खालील संयुक्तीक आदेश

१. वादी/अर्जदार बबन अडसुळ यांनी प्रस्तुतचे अर्ज हे वादी क्र.१ नंदा अडसुळ यांचेविरुध्द दावा अपशम अबेट तसेच वादीचे वारस यांना अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवुन त्यांचे वारस अभिलेखावर दाखल केले आहेत. प्रस्तुतचे अर्जासोबत वादीने शपथपत्र दाखल केले आहे.

२. वादी यांचे कथन की दावा प्रलंबीत असताना दाव्यातील वादी क्र.१ नंदा बबन अडसुळ हया दि.२८/५/२०२२ रोजी मयत झाले. त्यांचे वारस मुदतीमध्ये अभिलेखावर घेणे कायदयाने आवश्यक व गरजेचे होते. परंतु वादी हे वयस्कर, अशिक्षीत व अडाणी असल्यामुळे वादी यांना त्यांचा मृत्यु दाखला वेळेत मिळाला नाही. त्यामुळे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी ७ महिने २० दिवसांचा विलंब झाला आहे. विलंब झाल्यामुळे वादी क्र.१ याचेविरुध्द दावा हा अबेट झाला आहे. वादी पुढे कथन करतो की दावा हा वाद मिळकत गहानमुक्त करुन उलट खरेदीदस्त वादीचे लाभात होवुन त्याचा ताबा मिळणेकरीता आणि निरंतर ताकीदीकरीता दाखल केला असलेमुळे वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. वादी यांनी जाणीवपुर्वक विलंब केलेला नाही. दाव्याचे काम हे गुणदोषावर चालणेसाठी मयत वादी क्र.१ यांचे वारसांना दाव्यात समाविष्ट करुन घेणे आवश्यक व गरजेचे आहे. मयत वादी क्र.१ यांना त्यांचे पती श्री. बबन गणपत अडसुळ, मुलगा राकेश आणि चार मुली अश्वीनी गणेश रासकर, निता लक्ष्मीकांत भोसले, विद्या पवन तरटे व सोनाली कृष्णात शेवते असे वारस आहेत. मयत वादी क्र.१ यांचे वारसांना अभिलेखावर घेतलेंस प्रतिवादींचे कुठलेही काहीएक नुकसान होणार नाही. म्हणुन दाखल केलेले अर्ज हे मंजुर व्हावे म्हणुन विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जांचेकामी म्हणणे दाखल केले आहे की, सदरकामी वादी यांना वारस रेकार्डवरती घेणेस ७ महिने २० दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर कामी झालेले उशिरास संयुक्तीक कारण नमुद केलेले नसल्याने सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा. यदाकदाचित सदरचा अर्ज मंजुर केला तर हेवी कॉस्ट करणेचा हुकुम व्हा अशी विनंती केली आहे.

४. वादी यांचा अर्ज वाचला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले असता वादी यांनी प्रस्तुत दावा हा वाद मिळकत गहानमुक्त करुन उलट खरेदीदस्त वादीचे लाभात होवुन त्याचा ताबा मिळणेकरीता आणि निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात वादींनी पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असुन वादीचा उलटतपासासाठी दावा प्रलंबीत आहे. दावा प्रलंबीत असताना वादी नंदा बबन अडसुळ हया मयत झाल्या. वादी यांनी यादी नि.२४ व

२५ अन्वये वादी क्र.१ यांचा मृत्यु दाखला दाखल केला आहे. दावा प्रलंबीत असताना वादी क्र.१ हे मयत झाले. वादी यांनी मयताचे वारस अभिलेखावर घेणेसाठी मुदतीमध्ये अर्ज दाखल केला नाही. परिणामी तांत्रीकदृष्टया वादी क्र.१ विरुध्द दावा हा अपशम अबेट झाला आहे. वादी हे अशिक्षीत व अडाणी असलेमुळे त्यांना मयताचे वारस अभिलेखावर घेणेस विलंब झाला ही अर्जात नमुद कारणे ही संयुक्तीक वाटक नाहीत. परंतु दावा हा गुणदोषावर चालविणेसाठी मयत वादी यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक व गरजेचे आहे. दावा हा वाद मिळकत गहानमुक्त करुन उलट खरेदीदस्त वादीचे लाभात होवुन त्याचा ताबा मिळणेकरीता आणि निरंतर ताकीदीकरीता असल्याने भविष्यात मयत वादी क्र.१ चे वारसांची काही तक्रार राहु नये म्हणुन अर्ज मंजुर करणे आवश्यक व गरजेचे आहे. प्रतिवादी यांना वादी यांनी उशिरा अर्ज दाखल केलेमुळे नाहक त्रास सहन करावा लागला. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज हा काही कॉस्टचे अटीवर मंजुर होणे योग्य होईल म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज नि.२६, २८ आणि ३० मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादी यांनी प्रतिवादी यांना कॉस्टची रक्कम रु.४००/- दिलेनंतर वादी क्र.१ यांचेविरुध्द झालेला दावा अपशम अबेटचा आदेश तसेच वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येवुन मयताचे वारसांना अभिलेखावर घेणेत यावेत.

३. वादी यांनी अर्जानुसार सत्वर दुरुस्ती पुर्तता करावी

फलटण. (पी. एच. पाटील)

ता.१७/०४/२०२३. ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर फलटण.